# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.09.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>दादाभुसे</u>**

गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी काम करणाऱ्या जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांना ५ कोटी, ३ कोटी आणि २ कोटी रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिकं देण्यात येतील, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज पुण्यात केली. राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. शिक्षणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि पोषण या विषयांवर भर द्यायला हवा असं भुसे म्हणाले. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांचं महत्त्व कळावं, शेतीतील कामांचं निरीक्षण करता यावं, बँकेचे व्यवहार समजावेत यासाठी शैक्षणिक सहली काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**<u>इंद्रायणी</u>**

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला राज्य सरकारच्या नगर विकास विभागाच्या तांत्रिक समितीची काल मान्यता मिळाली. या प्रकल्पासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि पर्यावरण प्रेमी संस्थांनी 2022पासून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. एकंदर 526 कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून, अमृत अभियानाच्या दुसऱ्या टप्प्या अंतर्गत तो राबवला जाणार आहे.

पंधरवडापुणे महापालिकेच्यावतीने सध्या स्वच्छता पंधरवडा साजरा केला जात आहे. यानिमित्त महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज शिवाजीनगरच्या 'पाटील इस्टेट' झोपडपट्टीला भेट देऊन तिथल्या परिस्थितीची पाहणी केली. आणि नागरिकांशी संवादही साधला. या भागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

**<u>मार्ड</u>**

आधुनिक चिकित्सा औषधशास्त्र अभ्यासक्रम म्हणजे सीसीएमपी हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथीच्या डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणी करण्याच्या निर्णयाविरोधात राज्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील हजारो निवासी डॉक्टरांनी आणि प्रशिक्षणार्थी डॉक्टरांनी काळ्या फिती लावून शांततापूर्ण मार्गाने निषेध केला. पुण्यातील 'बीजे' शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील 'मार्ड' आणि प्रशिक्षणार्थी डॉक्टर देखील यामध्ये सहभागी झाले होते.

**<u>सुळे</u>**

पुणे आणि शहर परिसरात पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. सरकारने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पुण्यात केली. पुरंदर इथल्या भुयारी मार्गाची पाहणी केल्यानंतर त्या बोलत होत्या. जमीन अधिग्रहणाच्या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्याचं आश्वासन सुळे यांनी नागरिकांना दिलं.

**<u>पिंचिंप्रभाग</u>**

आगामी निवडणुकीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर आलेल्या ३१८ हरकती आणि सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना तयार केली आहे. राज्य निवडणूक आयोगाने अंतिम प्रभाग रचनेला मान्यता दिल्यानंतरच किती हरकती आणि सूचना स्वीकारल्या आहेत हे स्पष्ट होणार असल्याचं महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

**नवरात्रोत्सव**

पुण्यातील चतुःश्रृंगी मंदिरातील यंदाच्या नवरात्रोत्सवाचा कार्यक्रम विश्वस्त मंडळानं आज जाहीर केला. येत्या २२ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात मंदिर अहोरात्र दर्शनासाठी खुलं राहणार आहे. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सिमोल्लंघनाची पालखी मिरवणूक, ढोलताशा पथक आणि हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी हे प्रमुख आकर्षण राहणार आहे.

**विद्यार्थीसंख्या**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. यू-डायस या सर्वेक्षण संस्थेने नुकतीच याबाबतची आकडेवारी जाहीर केली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या १३४ शाळांमध्ये २०२२-२३ मध्ये ४८ हजार १५३ विद्यार्थी संख्या होती; आता २०२५-२६ मध्ये ८ सप्टेंबरपर्यंतच ही संख्या ५४ हजार ४१८ झाली आहे. यामध्ये मुलींचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

**डॉहेमासानेनिधन**

ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. हेमा साने यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं. त्या ८५ वर्षांच्या होत्या. निसर्गाशी एकरूप होऊन राहण्याची जीवनशैली त्यांनी आयुष्यभर सांभाळली. पुण्यातील

आबासाहेब गरवारे महाविद्यालयातून त्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांनी इतिहास, प्राच्यविद्या अशा विविध विषयांवर मिळून तीसहून अधिक पुस्तके लिहिली आहेत.

**<u>क्रीडा</u>**

पुणे जिल्हा टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत अकरा वर्षाखालील गटात मुलीमध्ये अहाना गोडबोले , मुलांच्या गटात वरदान कोलते, तेरा वर्षाखालील गटात मुलामध्ये नीरज नांदेडे तर मुलींच्या गटात शरण्या प्रधान विजेते ठरले.  प्रौढांच्या चाळीस वर्षांवरील गटात ओंकार जोग विजयी झाले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. उद्याही  आकाश ढगाळ राहून हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**